# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(“पूर्वीचे पुणे विद्यापीठ”)

**फोन ०२०-२५६०१२१६**
**फॅक्स ०२० २५६०१२०६**
website : www.unipune.ac.in

**गणेशखिंड,**
**पुणे -४११००७**
email : **st-management**@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/व्यवस्थापन/५००

दि. १७.०७.२०१५

प्रति,
मा. संचालक/प्राचार्य,
सर्व संलग्न व्यवस्थापन संस्था

विषय : व्यवस्थापन शाखेंतर्गत एप्रिल/मे, २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या पी.जी.डी.बी.एम., पी.जी.डी.एच.एम.,पी.जी.डी.एम.एल.एम.,पी.जी.डी.आय.ई.एम.,पी.जी.डी.एम.एम., पी.जी.डी.एफ.एस., पी.जी.डी.सी.एम. परीक्षांच्या गुणपत्रिकांबाबत

महोदय/महोदया,

व्यवस्थापन शाखेंतर्गत पी.जी.डी.बी.एम., पी.जी.डी.एच.एम., पी.जी.डी.एम.एल.एम., पी.जी.डी.आय.ई.एम., पी.जी.डी.एम.एम., पी.जी.डी.एफ.एस., पी.जी.डी.सी.एम.अभ्यासक्रमाच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. परीक्षेची गुणपत्रके खालीलप्रमाणे वितरित करण्यात येतील.

पुणे शहर, पुणे जिल्हा, अहमदनगर व नाशिक येथील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची वरील अभ्यासक्रमांच्या निकालाची गुणपत्रके शुक्रवार, दिनांक १७.०७.२०१५ रोजी दुपारी १.०० वाजता विद्यापीठाच्या परीक्षा विभागातून घेवून जायची आहेत.

आपल्या महाविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे एखाद्या विद्यार्थ्याच्या गुणपत्रकामध्ये काही दोष अथवा त्रुटी आढळल्यास, विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठात न पाठविता, महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून द्यावीत. त्यानंतर त्यातील दुरुस्त्या त्वरित करुन घेण्याबाबत कार्यवाही करता येईल.

आपणास विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची गुणपत्रके वेळेत घेवून जाण्याची व वितरण करण्याची व्यवस्था करावी.

कळावे.

आपला,

उपकुलसचिव,
(परीक्षा)